**उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गतच्या तंत्रशिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र व तत्सम पदवी व पदवीका संस्थामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्यांची देयके <u>HTE-सेवार्थ प्रणालीव्दारे अदा करण्याबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय, क्र.संकीर्ण २०१२/प्र.क्र. १४९/१२/तांशि-७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २१ नोव्हेंबर , २०१२

पहा :- उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. टीईएम ३३९९/(२२१/९९) तांशि-१ दि. ०४/०९/१९९९.

**<u>प्रस्तावना :-</u>**

राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते यांची देयके सेवार्थ या वेतन प्रणालीव्दारे तयार करण्यात येत आहेत. तसेच राज्यातील खाजगी अनुदानित, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच जिल्हा परिषदा व महानगरपालिका आणि नगरपालिकांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते शालार्थ या नवीन वेतन प्रणालीव्दारे अदा करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. राज्यातील विविध विभागांच्या अधिपत्याखालील सर्व मान्यता प्राप्त अनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांची वेतन देयके सुध्दा या प्रणालीमार्फत (आवश्यक त्या दुरुस्त्या करुन) करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील मान्यता व अनुदान प्राप्त अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र व तत्सम पदवी व पदवीका संस्थामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते अदा करण्यासंदर्भात मा.मुख्य सचिव यांच्याकडे वेळोवेळी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये देण्यात आलेले निदेश तसेच वित्त विभागाने वेळोवळी निर्गमित केलेले आदेश विचारात घेऊन या विभागासाठी सुधारीत केलेल्या **HTE-सेवार्थ** या नवीन वेतन प्रणालीव्दारे शासन हिश्याचे वेतन व भत्ते अदा करण्याची बाब व त्याची कार्यपध्दती विहित करण्याची बाब व त्या अनुषंगाने उपरोक्त नमुद केलेल्या दि. ०४/०९/१९९९ च्या शासन निर्णयात अंशत: सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

राज्यातील अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी / औषधनिर्माण शास्त्र / वास्तु शास्त्र व तत्सम पदवी व पदवीका संस्थामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्याची देयके **"HTE-सेवार्थ"** या संगणकीय प्रणालीव्दारे अदा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सद्यस्थितीत प्रायोगिक तत्त्वावर (pilot basis) राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे व लातुर या चार जिल्हयातील उपरोक्त अशासकीय अनुदानित संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वेतन देयके **"HTE-सेवार्थ"** या संगणक प्रणालीमार्फत माहे डिसेंबर, २०१२ चे माहे जानेवारी, २०१३ मध्ये देय असलेले वेतन व भत्ते यांची देयके काढण्यात यावीत, असेही आदेश या शासन निर्णयाव्दारे देण्यात येत आहेत. आता सर्व अशासकीय अनुदानीत संस्थातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना दरमहा वेतन **"HTE-सेवार्थ"** प्रणाली मार्फत अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याने उपरोक्त नमुद दि. ०४/०९/१९९९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४ (२) मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

अ) राज्यातील सर्व अशासकीय अनुदानीत अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र व तत्सम पदवी व पदविका संस्थामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचे वेतन दि. ०४/०९/१९९९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ६ मध्ये नमुद केलेल्या सुत्रानुसार दरमहा अदा करण्यात यावे.

ब) वेतनेतर खर्चासाठी दि. ०४/०९/१९९९ च्या शासन निर्णयातील परिच्छेद ४ (२) मध्ये नमुद केल्यानुसार ४ हप्त्यात त्यातील नमुद कार्यपध्दती अनुसरुनच सदर शासन निर्णयात नमुद केलेल्या विविध बाबीवरील खर्चाच्या मर्यादेत अनुदान अदा करण्यात यावे.

२. **"HTE-सेवार्थ"** या संगणकीय प्रणालीमध्ये अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र व तत्सम पदवी व पदविका संस्थामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची आवश्यक सर्व माहिती भरण्याचे (Data entry) काम पुर्ण करुन घेण्याची जबाबदारी खालीलप्रमाणे सोपविण्यात येत आहे :-

| अ क्र | संस्थेचा प्रकार | **वेतन देयकेकरीता लागणारी आवश्यक ती सर्व माहिती भरण्यासाठी (Data entry) प्राथमिक जबाबदार आणि प्रमाणित करुन माहिती सादर करणारा अधिकारी** | **कार्यक्षेत्रातील सर्व संस्थांचे वेतन देयकाकरिता लागणारी आवश्यक ती सर्व माहिती भरुन घेण्यासाठी आणि ती अचूक आहे हे प्रमाणित करण्यासाठी जबाबदार अधिकारी** | **या संपुर्ण कामाकरिता पर्यवेक्षक / संनियंत्रक आणि प्रमाणपत्रावर प्रतिस्वाक्षरी करणारा अधिकारी** |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र व तत्सम पदवी संस्था (महाविद्यालये) | संबधित महाविद्यालंयाचे संचालक / प्राचार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड यांचेबाबतीत प्रबंधक | वेतन पथक प्रमुख, (संबधित प्रशासकीय अधिकारी, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय) | संबधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय |
| २ | अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र व तत्सम पदिवका संस्था | संबधित तंत्रनिकेतनाचे प्राचार्य | वेतन पथक प्रमुख, (संबधित प्रशासकीय अधिकारी, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय) | संबधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय |

अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र व तत्सम पदवी व पदवीका संस्थामधील संचालक / प्राचार्य/ डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड यांचेबाबतीत प्रबंधक यांनी संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सर्व आवश्यक ती माहिती **"HTE-सेवार्थ"** मध्ये भरावी व तसे प्रमाणपत्र सादर करुन माहिती संबधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्याकडे सादर करावी. तद्नंतर वरील रकाना क्र. ४ मधील वेतन पथक प्रमुख, (संबधित प्रशासकीय अधिकारी, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय) यांनी त्याची पडताळणी करुन तसे प्रमाणपत्र द्यावे व त्यावर रकाना क्र. ५ मधील संबधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांनी भरलेली माहिती तपासुन प्रमाणपत्रावर प्रतीस्वाक्षरी करावी.

३. **"HTE-सेवार्थ"** प्रणालीमध्ये भरलेली माहिती ही अंतिम राहिल. त्यामध्ये पुन्हा बदल करता येणार नाही. माहितीमध्ये बदल करावयाचा झाल्यास तसा समर्थनात्मक प्रस्ताव संचालक, तंत्रशिक्षण यांना सादर करावा. आवश्यकते प्रमाणे तसे बदल संचालक, तंत्रशिक्षण यांचे स्तरावरुन केले जातील.

४. "**HTE-सेवार्थ**" प्रणालीव्दारे अदा करण्यात येणारे कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन यापुढे संबंधित अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र व तत्सम पदवी व पदवीका संस्थामधील संचालक / प्राचार्य / डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड यांचेबाबतीत प्रबंधक यांचेमार्फत न करता थेट संबंधित कोषागार कार्यालयामार्फत संबंधित कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात ECS व्दारे जमा करावे अथवा कोषागाराने विभागीय सह संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांचे कार्यालयातील आहरण व संवितरण अधिका-यांच्या बँक खात्यात ECS व्दारे जमा करावे व तद्नंतर त्यांनी ते थेट ECS व्दारे कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करावे.

५. यापुढे अनुदानित संस्थेतील कर्मचाऱ्यांचे वेतन ECS व्दारे संबंधित कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार असल्याने कर्मचाऱ्यांच्या बँकखात्याबद्दलची अधिकृत माहिती संबंधित संस्थेकडे असणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधित अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र व तत्सम पदवी व पदवीका संस्थामधील संचालक / प्राचार्य / डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड यांचेबाबतीत प्रबंधक यांनी "परिशिष्ट—अ" मध्ये दर्शविल्यानुसार सर्व कर्मचाऱ्यांकडून आवश्यक ते प्रमाणपत्र त्यांच्या स्वाक्षरीनिशी प्राप्त करुन घ्यावे व ते संग्रही ठेवावे व त्याची एक प्रत संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय यांना उपलब्ध करुन द्यावी. तसेच संबंधित संस्थेने त्यांच्या अखत्यारितील कर्मचाऱ्यांचे "परिशिष्ट —अ" मधील प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन ते संग्रही ठेवण्यात आल्याचे "परिशिष्ट—ब" नुसार प्रमाणपत्र संबधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांना सादर करावे.

६. "**HTE-सेवार्थ**" या संगणकीय प्रणालीमध्ये माहिती भरल्यानंतर उपरोक्त परिच्छेदातील कार्यक्षेत्रातील सर्व अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / वास्तुशास्त्र व तत्सम पदवी व पदवीका संस्थामधील वेतन देयकाकरिता लागणारी आवश्यक ती सर्व माहिती भरुन घेण्यासाठी वेतन पथक प्रमुख, (संबधित प्रशासकीय अधिकारी, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय) यांनी संबंधित संस्थेचे संचालक / प्राचार्य / डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड यांचेबाबतीत प्रबंधक यांचेकडून सही व संस्थेच्या शिक्क्यानिशी प्राप्त होणाऱ्या माहितीची मुद्रीत प्रत उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन पडताळणी करुन संबधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्याकडे सादर करावी. सदर माहिती भरणे व त्याची पडताळणी करण्याची कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत **नोव्हेंबर, २०१२ पूर्वी** पूर्ण करण्यात यावी. उपरोक्त क्र. २ येथील परिच्छेदामधील तक्त्यात क्र. ४ या रकान्यात दर्शविलेल्या वेतन पथक प्रमुख, यांनी (संबधित प्रशासकीय अधिकारी, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय), प्रणालीतून तयार होणारे प्रमाणपत्र मुद्रित करुन घ्यावे व त्यावर स्वाक्षरी करुन कार्यालयीन शिक्का उमटवून ते रकाना क्र. ५ मधील संबधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांच्याकडे तीन प्रतीत सादर करावे. रकाना क्र. ५ मधील संबधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांनी त्याची एक प्रत स्वत:कडे ठेऊन दोन प्रती तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचेकडे पाठवाव्यात. संचालनालयाने त्याची एक प्रत स्वत:कडे ठेऊन दुसरी प्रत शासनास सादर करावी.

७. संच मान्यता व वैयक्तिक मान्यता प्रदान करण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या संबधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांना प्रदान करण्यात आलेल्या संकेतांकाने या प्रणालीमध्ये प्रवेश करुन संबंधित संस्थांची माहिती तपासून मान्य (Approve) करावी, अशाप्रकारे माहिती मान्य केल्याशिवाय संबंधित संस्थांना पुढील कार्यवाही करता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

८. "**HTE-सेवार्थ**" या प्रणालीमध्ये माहिती भरणे, सदर प्रणाली हाताळणे आणि त्याव्दारे वेतन देयक तयार करणे इत्यादी बाबत प्रशिक्षण देण्याकरिता मास्टर ट्रेनरची निवड संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी करावी. सदर मास्टर ट्रेनर्सला प्रथम टप्प्यात मेसर्स टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस यांच्या कर्मचाऱ्यांकडून सर्वसमावेशक प्रशिक्षण देण्यात येईल. मास्टर ट्रेनर्सनी पुढे त्यांच्या कार्यक्षेत्रातील संस्थांमधील संबंधित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची कार्यवाही करावी. याबाबतचा सविस्तर कार्यक्रम संचालक तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी तयार करुन राबवावा. मास्टर ट्रेनर्सचे प्रशिक्षण आणि त्या पुढील प्रशिक्षण हे दोन्ही टप्पे कोणत्याही परिस्थितीत **दि. ५ डिसेंबर, २०१२ पूर्वी** पूर्ण करणे आवश्यक आहे. या योजनेवर संनियंत्रण ठेवणे आणि

ती परिणामकारकरित्या राबविण्याची जबाबदारी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची राहिल.

९. माहे डिसेंबर, २०१२ चे देय असलेले वेतन जानेवारी, २०१३ मध्ये अदा करण्याकरिता ते **"HTE-सेवार्थ"** प्रणालीवर वेतन देयकाबरोबर सध्याच्या प्रचलित कार्यप्रणाली प्रमाणे देयके संबंधित कोषागार कार्यालयाकडे सादर करावीत. मात्र सध्याच्या कार्यपध्दतीनुसार तयार केलेले वेतन **HTE-सेवार्थ** प्रणालीवर सादर केल्याशिवाय संबंधित कोषागार कार्यालयाकडून स्वीकारले जाणार नाही.

१०. उपरोक्त संस्थांना शासन निर्णय क्रमांक : टीईएस-३३९९/(२२१/९९)/तांशि-१, दिनांक ४ सप्टेंबर, १९९९ नुसार विहित करण्यांत आलेल्या प्रचलित अनुदान सुत्रातील तरतूदीनुसार वेतन अनुदान अनुज्ञेय राहील. सदर अनुदान सुत्रानुसार देयके सादर करण्याची जबाबदारी संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांची राहील.

११. तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत कार्यरत अशासकीय अनुदानित संस्थांकरीता, ती संस्था ज्या विभागीय कार्यालयाच्या कार्यकक्षेत येत असेत त्या विभागीय कार्यालयाचे संबंधित सहसंचालक यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यांत येत आहे.

१२. **HTE-सेवार्थ** प्रणालीमार्फत दि. ४ सप्टेंबर, १९९९ च्या शासन निर्णयानुसार वेतनासाठी देय असलेले फक्त शासनाच्या हिश्या पर्यंतचे सहाय्यक अनुदान संबंधित संस्थाना अदा करण्यात येईल. यामधून संविधानिक कपाती (Statutory Deductions) उदा. भविष्य निर्वाह निधी अंशदान, अग्रिम परतफेड हप्ता, व्यावसाय कर, आयकर इ. कर्मचाऱ्यांच्या वेतनातून कपाती करण्याची संपूर्ण जबाबदारी संबधित तंत्र शिक्षण विभागीय कार्यालयातील आहरण व संवितरण अधिका-यांची राहील .

१३. या आदेशान्वये अशासकीय अनुदानित संस्थांच्या कर्मचाऱ्यांचे काढण्यात येणारे वेतन व भत्ते मागणी क्रमांक : डब्ल्यू-३, मुख्य लेखा शिर्ष २२०३-तंत्राशिक्षण या लेखा शिर्षाखालील उप लेखा शिर्षातंर्गत पुढील प्रमाणे काढण्यांत यावेत.

(अ) **सर जे.जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, मुंबई करीता :-**
१०२ तंत्रशिक्षणासाठी विद्यापीठांना सहाय्य,
(०१) (०१) वास्तुशास्त्र महाविद्यालयासाठी मुंबई विद्यापीठाला परिरक्षण अनुदान (योजनेत्तर) (२२०३ ००६ ९)
३६ सहाय्यक अनुदान – (वेतन)

(ब) **डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड करीता :-**
१०२ तंत्रशिक्षणासाठी विद्यापीठांना सहाय्य,
(०१) (०२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जिल्हा-रायगड यासाठी परिरक्षण अनुदान (योजनेत्तर) (२२०३ ०५२ ३)
३६ सहाय्यक अनुदान – (वेतन)

(क) **अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये करीता :-**
१०४ अशासकीय तंत्र महाविद्यालये व संस्थांना सहाय्य,
(०१) (०३) अभियांत्रिकी महाविद्यालये (योजनेत्तर) (२२०३ ०१६ ७)
३६ सहाय्यक अनुदान – (वेतन)

(ड) **अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतने करीता :-**
१०४ अशासकीय तंत्रमहाविद्यालये व संस्थांना सहाय्य,
(०१) (०२) तंत्रनिकेतने (योजनेत्तर) (२२०३ ०१५ ८)
३६ सहाय्यक अनुदान — (वेतन)

१४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक सं.क्र. २५७/कोषा-५, दि. १९/११/२०१२ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

**(सुधीर पं. शास्त्री)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई-३२
मा.मंत्री , उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२
मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई-३२
मा.मुख्यसचिव यांचे स्विय सहायक, मंत्रालय मुंबई-३२
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
सचिव माहिती व तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
प्र. संचालक तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-०१
विभागीय सह संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
सर्व संबंधित संचालक / प्राचार्य, अशासकीय अनुदानित संस्था (संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, यांचेमार्फत)
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी,
सहसंचालक, सुधारणा, लेखा व कोषागारे, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी / अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवडनस्ती तांशि-७

# परिशिष्ठ - अ

## प्रमाणपत्र

मी ---------------------------------------------------------------- (नांव) ------------------------------------------- -------(पदनाम), याव्दारे प्रमाणित करतो / करते की, माझे मासिक वेतन तसेच इतर भत्ते यांचे प्रदान मला इलेक्ट्रॉनिक पध्दतीने थेट माझ्या बँक खात्यात जमा करण्यात येणार असल्याने आजपासून यापुढे ज्या दिवशी अशा प्रकारे माझे मासिक वेतन तसेच इतर भत्ते यांचे प्रदान मला इलेक्ट्रॉनिक पध्दतीने थेट माझ्या बँक खात्यात जमा करण्यात येतील त्या दिवशी ते मला प्राप्त झाले असे समजण्यात येईल. याबाबत माझी कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप राहणार नाही. माझे मासिक वेतन तसेच इतर भत्ते यांचे प्रदान मला इलेक्ट्रॉनिक पध्दतीने थेट माझ्या खाली नमूद केलेल्या बँक खात्यात जमा करण्यात यावे.

बँकेचे नांव :-

शाखेचे नांव व पत्ता :-

बचत खाते क्रमांक :-

एमआयसीआर कोड :-

आयएफएससी कोड :-

स्वाक्षरी/-

दिनांक :- (कर्मचाऱ्यांचे नांव)

(पदनाम)

कार्यालयाचा पत्ता

## परिशिष्ठ- ब
## प्रमाणपत्र

दिनांक :

**संस्थेचे नांव व पूर्ण पत्ता:-**

**संचालक / प्राचार्य यांचे नांव:-**

प्रमाणित करण्यात येते की, माझ्या ---------------------------------- संस्थेतील सर्व शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१२/प्र.क्र. १४९/१२/तांशि-७ दिनांक २१ नोव्हेंबर, २०१२ सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नेमून दिलेले बँकखात्यासंबंधीचे प्रमाणपत्र प्राप्त करुन ते संग्रही ठेवण्यात आले आहे.

------